दैनिक

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

# महावृत्त

संपादक - अशोक हनवते. मो - 9421094991,7264079990




लातूर वर्ष ३ रे अंक २१७ वा बुधवार दि.३१ जानेवारी २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

# मंत्रिमंडळाला विश्वासात न घेता मराठा आरक्षणाची अधिसूचना

मुंबई (प्रतिनिधी) : कोणाच्याही आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण देऊ, असे सरकारकडून सांगितले जात होते. याला आमचा अजिबात विरोध नव्हता; परंतु सरकारने ओबीसीच्या डोळ्यात धूळफेक करण्याचं काम केलं आहे. मंत्रिमंडळालाही विश्वासात न घेता मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबतची अधिसूचना काढण्यात आली, असा आरोप विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी आज केला.ओबीसी संघटनांची बैठक विजय वडेट्टीवार यांनी आज बोलावली होती. या बैठकीनंतर आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना वडेट्टीवार यांनी सरकारवर तिखट शब्दात टीका केली. मंत्रिमंडळालाही विश्वासात न घेता मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबतची अधिसूचना काढण्यात आली. मराठा समाजाचा नेता म्हणून मिरवण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी ही अधिसूचना काढली आहे. या अधिसूचनेमुळे ओबीसी समाजावर अन्याय झाला असून या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी येत्या २० फेब्रुवारीला संभाजीनगर येथे ओबीसींच्या विराट सभेचे आयोजन केले आहे. ही सभा ओबीसींच्या संविधानिक हक्काच्या रक्षणासाठी आहे. आरक्षण देण्यावरून सरकारमध्ये श्रेयवादाची लढाई सुरू असून या लढाईमुळे ओबीसी समाजाला उद्ध्वस्त करण्याचे पाप सरकारकडून केले जात आहे. आमचा मराठा समाजाच्या आरक्षणाला विरोधी नाही, असे विजय वडेट्टीवार यांनी



स्पष्ट केले.ज्यांच्या नोंदी आहेत त्यांना आरक्षण देण्यास आमची हरकत नाही मात्र सगेसोयरे शब्दामुळे ओबीसी आरक्षणात कोणाचाही शिरकाव होऊ शकतो. अटी शिथिल केल्यामुळे कोणालाही प्रमाणपत्र मिळू शकते. हे चुकीचे आहे. सरकार एकाच समाजाचे हित पाहत आहे. सरकारची ही अडेलतट्टूपणाची भूमीका ओबीसी समाजाला खड्ड्यात घालणारी आहे. आजवर एकत्र राहणा-या समाजाला एकमेकांचे वैरी करण्याचे काम सुरू आहे, अशी टीका त्यांनी केली.

## दबावापुढे कुमार झुकले!

पाटणा : बिहारमधील राजकीय घडामोडींमुळे इंडिया आघाडीला धक्का बसल्यानंतर काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी पहिल्यांदाच नितीश कुमार यांच्याबद्दल विधान केले आहे. त्यांनी नाव न घेता बिहारच्या मुख्यमंत्र्यांवर जोरदार निशाणा साधला आहे. राहुल गांधी म्हणाले की, थोडासा दबाव पडताच त्यांनी (नितीश कुमार) यू-टर्न घेतला. पण दबाव का? कारण आम्ही जनतेच्या दृष्टीने महत्त्वाचे मुद्दे मांडत आहोत. भारत जोडो न्याय यात्रा बिहारमध्ये दाखल झाली आहे. राहुल गांधी म्हणाले की अखिलेशजी यांचे भाषण सुरू असताना बघेलजी यांनी मला एक विनोद सांगितला. तुमच्या राज्याच्या मुख्यमंत्र्यांबद्दल एक विनोद आहे. आपले मुख्यमंत्री शपथ घेण्यासाठी राज्यपालांच्या ठिकाणी गेले. मोठा जल्लोष झाला. तेथे भाजपा नेते आणि राज्यपाल बसले होते. मुख्यमंत्री आणि मंत्रिपदाची शपथ घेतली जाते. त्यानंतर ते सीएम हाऊसकडे रवाना झाले. कारमध्ये त्यांना आपली शाल राज्यपालांच्या घरी विसरल्याचे लक्षात येते. यावर ते ड्रायव्हरला राज्यपालांच्या घरी परत जाण्यास सांगतात. राज्यपालांकडे गेले आणि दरवाजा उघडताच राज्यपाल म्हणाले, अरे, तुम्ही इतक्या लवकर



आलात का? अशी बिहारची अवस्था आहे. थोडासा दबाव येताच यू-टर्न घेतात.जातनिहाय जनगणनावरून काढला पळ नितीशजी का अडकले ते समजून घ्या. मी त्यांना थेट सांगितले की तुम्हाला बिहारमध्ये जातीनिहाय जनगणना करावी लागेल. आरजेडीसह नितीशजींनी सर्वेक्षण करण्याचा आग्रह धरला. मात्र भाजप घाबरला. ते या योजनेच्या विरोधात आहेत. नितीशजी अडकले आणि भाजपाने त्यांना पळून जाण्यासाठी मागच्या दाराने जागा दिली. लोकांना सामाजिक न्याय मिळवून देण्याची जबाबदारी आमच्या आघाडीची आहे आणि त्यासाठी आम्हाला नितीशजींची गरज नाही असे देखील राहुल गांधी यांनी म्हटले आहे.

## रेणापूर क्रीडा संकुल अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल आ. रमेशआप्पा कराड यांचा सत्कार



लातूर दि.३०- रेणापूर तालुका क्रीडा संकुल अध्यक्षपदी विधानपरिषदेचे सदस्य भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा यथोचित सत्कार करून रेणापूर तालुका भाजपाच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. यावेळी भारतीय जनता पार्टीच्या सतीश आंबेकर यांनी शाल घालून पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार केला. याप्रसंगी ॲड. दशरथ सरवदे, डॉ. बाबासाहेब घुले, वसंत करमुडे, अनंत चव्हाण, गंगासिंह कदम, श्रीकृष्ण जाधव, बिबीशन उपाडे, शिवाजी जाधव, सुधाकर फुले यांच्यासह अनेक जण होते.

## बीड जिल्ह्यात ६८ टक्के सर्वेक्षण पूर्ण

बीड : मराठा आरक्षणाच्या पार्श्वभूमीवर राज्य मागासवर्ग आयोगाकडून मराठा आणि खुल्या प्रवर्गाचा सर्वेक्षण केला जात आहे. यासाठी २३ जानेवारीपासून सुरुवात करण्यात आली असून, ३१ जानेवारीला हे सर्वेक्षण संपणार आहे. मागील सहा दिवसांत मराठवाड्यात सर्वेक्षणाचे काम मोठ्या वेगाने सुरु आहे. दरम्यान, अशीच काही परिस्थिती बीड जिल्ह्यात पाहायला मिळत आहे. बीड जिल्ह्यात आतापर्यंत ६८ टक्के सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाले आहेत.मराठा आणि खुल्या प्रवर्गाच्या सर्वेक्षणाला वेग आला असून, उद्या या सर्वेक्षणाची अंतिम तारीख आहे. बीड जिल्ह्यामध्ये आतापर्यंत ६८ टक्के मराठा आणि खुल्या प्रवर्गाचं सर्वेक्षण पूर्ण करण्यात आला आहे. शहरी आणि ग्रामीण भागामध्ये २३ जानेवारीपासून या सर्वेक्षणाला सुरुवात झाली होती. बीड जिल्ह्यामध्ये सर्वेक्षणाला सुरुवात झाल्यानंतर पहिल्याच दिवशी तांत्रिक अडचणीमुळे सर्वेक्षण करता आलं नव्हतं. मात्र, आता या सर्वेक्षणाला वेग आला असून, सर्वेक्षण करणारे कर्मचारी दारोदारी जाऊन खुल्या



प्रवर्गाचं सर्वेक्षण करत आहेत. या सर्वेक्षणासाठी १८२ प्रश्नाची प्रश्नावली असून, काही प्रश्न किचकट असल्याचे सर्वेक्षण करणाऱ्या अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.सर्वेक्षणाच्या कामाला वेग सर्वेक्षणाची उद्या शेवटची तारीख असून, मराठा आणि खुल्या प्रवर्गातून देखील मोठ्या प्रमाणात या सर्वेक्षणाला प्रतिसाद मिळत आहे. मागासवर्गीय आयोगाकडून हे सर्वेक्षण केले जात असून, मराठा आणि खुल्या प्रवर्गातील प्रत्येक नागरिकाची माहिती ऑनलाईन पद्धतीने भरण्यात येत आहे. उद्या या सर्वेक्षणाची शेवटची तारीख असल्याने अधिकाऱ्यांनी-कर्मचाऱ्यांनी सर्वेक्षणाच्या कामाला वेग दिला आहे.

## नवव्या राज्यस्तरीय शिक्षक साहित्य संमेलनाचे थाटात उद्घाटन

## नवे शैक्षणिक धोरण समाजात विषमता निर्माण करणारे

लातूर : - कौशल्य विकासाच्या नावाखाली विज्ञानाला नाकारणारे नवे शैक्षणिक धोरण समाजात विषमता निर्माण करणारे असल्याने त्याला थोपविण्याची जबाबदारी समस्त समाजाची असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक प्रा. ऋषिकेश कांबळे यांनी केले. महाराष्ट्र प्रदेश शिक्षक प्रतिनिधी सभेच्या वतीने लातुरात आयोजित करण्यात आलेल्या नवव्या राज्यस्तरीय शिक्षक संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी संमेलनाध्यक्ष या नात्याने प्रा. ऋषिकेश कांबळे आपले विचार व्यक्त करत होते. या साहित्य संमेलनाचे उद्घाटन लातूर जिल्हा परिषदेचे माध्यमिक शिक्षणाधिकारी नागेश मापारी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर संमेलनाचे मुख्य संयोजक कालिदास माने, ज्येष्ठ साहित्यिक फ. म . शहाजिंदे, ज्येष्ठ कवी योगीराज माने, महाराष्ट्र विकास आघाडीचे राष्ट्रीय उपाध्यक्ष बसवंतप्पा उबाळे, प्रा. गोविंदराव घार , प्रभाकर कापसे, अभंगराव बिराजदार, प्रा. यु.डी. गायकवाड, ब्रिजलाल कदम, संजय आलमले आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. दीपप्रज्वलन व सावित्रीबाई फुलेंच्या प्रतिमा पूजनाने संमेलनाचे उद्घाटन करण्यात आले. संमेलनाध्यक्ष या नात्याने उपस्थितांना मार्गदर्शन करताना प्रा. ऋषिकेश कांबळे यांनी तत्कालीन मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांनी आणलेल्या खाजगी विनाअनुदानित तत्वाच्या निर्णयाने समाजात विषमता वाढीस लागल्याचा आरोप केला. विनाअनुदानित तत्वामुळे संस्थाचालक तर अडचणीत आलेच, त्याचबरोबर गोरगरीब विद्यार्थ्यांचे शिक्षणही धोक्यात आल्याचे सांगितले. आता नव्याने अंमलात आणला जाणारा सन २०२० चा शिक्षण मसूदाही कौशल्य विकासाच्या नावाखाली समाजात विषमता वाढवणारा आहे. नवे शैक्षणिक धोरण अन्यायकारक असून त्यामुळे सर्वसामान्य विद्यार्थी उच्च शिक्षणापर्यंत जाऊही शकणार नाही. जुन्या काळात उत्तम संस्काराची बूज राखण्याचे काम शिक्षक करत असत. शिक्षक हे संस्कृती, समाज, राष्ट्र - आदर्शांचे शिल्पकार असतात. त्यामुळे नव्या शैक्षणिक धोरणाच्या बाबतीत शिक्षकांची जबाबदारी वाढणार असल्याचे नमूद केले.





विज्ञान आणि तंत्रज्ञान मानवाच्या सुखासाठी असल्याची जाणीव भारतीयांना सर्वप्रथम करून देण्याचे काम ब्रिटिशांच्या राजवटीत लॉर्ड डलहौसीने केले होते, ही बाब सर्वज्ञात आहे. डलहौसीमुळे आपल्या देशात रेल्वे, पोस्ट, तारखाते, विधानपरिषद अस्तित्वात आल्याचे सांगून पहिल्या महिला शिक्षिका सावित्रीबाई फुले नसत्या तर आज समाजातील कोणतीही स्त्री सुशिक्षित होऊ शकली नसती असे कांबळे यांनी सांगितले. फुले दाम्पत्यांची ही प्रेरणा समाजाला किती पुढे घेऊन जाऊ शकली ते आजच्या सुशिक्षित महिलांकडे पाहिल्यास लक्षात येते. महात्मा गांधी, डॉ. आंबेडकर यांचे शिक्षणविषयक विचार अत्यंत प्रेरणादायी होते, ही बाब कदापि नाकारून चालणार नसल्याचे प्रा. ऋषिकेश कांबळे यांनी सांगितले.

यावेळी उद्घाटक म्हणून आपले विचार व्यक्त करताना शिक्षणाधिकारी नागेश मापारी यांनी शिक्षक साहित्य संमेलनाने शिक्षकांचे अनेक पैलू समाजासमोर येण्यास मोलाची मदत होणार असल्याचे सांगितले. यावेळी योगीराज माने, गोविंद घार यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे विस्तृत प्रास्ताविक संयोजक कालिदास माने यांनी केले. प्रास्तविकात त्यांनी या साहित्य संमेलनाच्या आयोजनामागची पार्श्वभूमी सविस्तरपणे विशद केली. आपल्या पहिल्या साहित्य संमेलनाला तत्कालीन मुख्यमंत्री दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख आवर्जून उपस्थित होते हे सांगताना माने यांचा कंठ अक्षरशः दाटून आला. या साहित्य संमेलनात विविध परिसंवादाचे आयोजन करण्यात आले असून समारोप सत्रात लोकनेते विलासराव देशमुख ज्ञानरत्न पुरस्कार, जीवनगौरव पुरस्कार वितरण व कालिदासराव माने गौरव ग्रंथाचे प्रकाशन शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांच्या हस्ते होणार असल्याचे सांगितले. यामध्ये ज्ञानरत्न पुरस्कार डॉ. जनार्दन वाघमारे यांना, प्रा. शिवराज मोटेगावकर यांना जीवनगौरव तर ज्ञानेश्वर ठाकरे यांना मरणोत्तर जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याचे सांगितले. उद्योगरत्न पुरस्कार द्वारकादास श्यामकुमारचे तुकाराम पाटील यांना तर प्रशासकरत्न पुरस्काराने लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर - घुगे यांना सन्मानित करण्यात येणार असल्याचेही माने यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन विवेक सौताडेकर यांनी तर आभार प्रदर्शन अभंग बिराजदार यांनी केले. या साहित्य संमेलनास राज्याच्या कानाकोपऱ्यातून शिक्षक प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित आहेत.

# संपादकीय....

## ऊर्जाक्रांतीच्या सूर्यशलाका

सागर कुलकर्णी, वीज अभ्यासक देशातील औष्णिक आणि जलविद्युत प्रकल्पांचे फायदे आणि तोटे लक्षात घेता, स्वच्छ ऊर्जा हा एकमेव व्यवहार्य पर्याय आहे. यामुळेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अयोध्येत झालेल्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यातून परतल्यानंतर लगेचच 'प्रधानमंत्री सूर्योदय योजना' सुरू करण्याची घोषणा केली. याचा उद्देश समाजातील दुर्बल घटकांना वीज बिलापासून दिलासा देणे आणि स्वच्छ ऊर्जेच्या वापरास प्रोत्साहन देणे हा आहे. पर्यावरणीय संकट आणि वाढत्या महागड्या ऊर्जा संसाधनांना पर्याय म्हणून स्वच्छ ऊर्जा; विशेषत: सौरऊर्जा ही जगातील पहिली पसंती बनली आहे. भारतानेही या दिशेने वेगाने पावले उचलली आहेत. या सर्जनशील प्रयत्नांमुळे आज देशातील सौरऊर्जेची स्थापित क्षमता ७३ गिगावॅटवर पोहोचली आहे. अक्षय ऊर्जा मंत्रालयाच्या मते, डिसेंबर २०२३ पर्यंत भारतात रूफटॉप सोलर क्षमता सुमारे ११.०८ गिगावॅट आहे. जागतिक ऊर्जेच्या गरजांवर नजर ठेवणार्या संस्था सांगत आहेत की, येत्या तीन दशकांत भारतातील ऊर्जेची मागणी जगातील अन्य देशांच्या तुलनेत सर्वाधिक वाढणार आहे. अशा परिस्थितीत, हे आव्हान पेलण्यासाठी आपल्याला ऊर्जेचे नवीन स्रोत शोधणे आवश्यक आहे. निःसंशयपणे, अक्षय ऊर्जा हा एक चांगला पर्याय असू शकतो.देशातील औष्णिक आणि जलविद्युत प्रकल्पांचे फायदे आणि तोटे लक्षात घेता, स्वच्छ ऊर्जा हा एकमेव व्यवहार्य पर्याय आहे. यामुळेच पंतप्रधान मोदी यांनी अयोध्येत झालेल्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यातून परतल्यानंतर लगेचच 'प्रधानमंत्री सूर्योदय योजना' सुरू करण्याची घोषणा केली. याचा उद्देश समाजातील दुर्बल घटकांना वीज बिलापासून दिलासा देणे आणि स्वच्छ ऊर्जेच्या वापरास प्रोत्साहन देणे हा आहे.सध्या संपूर्ण जग अपारंपरिक ऊर्जास्रोतांवर भर देत आहे. जलविद्युत तयार करणे, वितरित करणे आणि प्रकल्पाची देखभाल करणे या गोष्टी तुलनेने स्वस्त असतात. या प्रकल्पात हवेचे प्रदूषण होत नाही; पण ग्रीन हाऊस गॅसेस जास्त प्रमाणात हवेत सोडले जात असतात. औष्णिक वीजनिर्मिती केंद्रामुळे तर प्रचंड प्रदूषण होते. या वीजनिर्मिती केंद्रातून बाहेर पडणार्या विषारी वायूंचे म्हणजे कार्बन मोनॉक्साईड, मिथेन, सल्फर डायऑक्साईड यांचे प्रमाण पराकोटीला जाते, तेव्हा आम्ल वर्षा होण्याची शक्यता असते. अणू वीज प्रकल्पाचे धोकेही समोर आले आहेत आणि त्यावर खूप चर्चा होत आहे. हा प्रकार प्रदूषण करीत नाही आणि त्यातला अपघात हा शेवटी अपवाद असतो, असे सांगत या प्रकाराचा धोका कमी असल्याचे दाखवले जात असते.सौरऊर्जा हा शाश्वत स्वच्छ ऊर्जेचा स्रोत म्हणून पुढे आला आहे. अमेरिकेतल्या अनेक कारखानदारांनी प्रचलित वीज बंद करून किंवा कमी करून सौरऊर्जा वापरायला सुरुवात केली. आपल्याकडेही सौरऊर्जा, पवनऊर्जा अशा अपारंपरिक ऊर्जा साधनांचा प्रसार गेल्या दशकभरात मोठ्या प्रमाणावर होत आहे. आता केंद्र सरकारच्या नव्या योजनेंतर्गत, गरीब आणि निम्न मध्यमवर्गीय कुटुंबांचा वीज खर्च कमी करण्याच्या उद्देशाने देशातील एक कोटी घरांवरील छतांवर सौर पॅनेल बसविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सूर्याच्या उष्णतेपासून ऊर्जा मिळवण्यासाठी बसवलेल्या पॅनेल्सचा वापर केल्यास वीज बिलात कपात होणार असून, त्यामुळे लोकांना आर्थिक दिलासा मिळणार असल्याचे सांगण्यात येत आहे.सध्या केंद्र सरकार सौरऊर्जेशी संबंधित 'राष्ट्रीय रूफटॉप योजना' ही योजना राबवत आहे. या योजनेंतर्गत, छतावर सौर पॅनेल बसवायचे असतील, तर सरकार ३ किलोवॅट क्षमतेचे सौर पॅनेल बसवण्यासाठी ४० टक्के अनुदान (रु. १४,५८८ प्रतिकिलोवॅट) देते. रूफटॉप सोलर स्कीम फेज-२ अंतर्गत ३० नोव्हेंबर २०२३ पर्यंत देशात २,६५१ मेगावॅट क्षमतेची रूफटॉप सोलर पॅनेल बसवण्यात आली आहेत. रूफटॉप योजनेचा दुसरा टप्पा ३१ मार्च २०२६ पर्यंत वाढवण्यात आला आहे. या योजनेच्या दोन्ही टप्प्यांमधून सध्या १०,४०७ मेगावॅट वीज तयार केली जात आहे. सध्या गुजरात, केरळ आणि महाराष्ट्र रूफटॉप सोलर सिस्टीम बसवण्यात पुढे आहेत.

# विश्वकर्मीय सुतार समाजातील सर्वच समाज नेत्यांना जाहीर सामाजिक आवाहन.

गर्व से कहो हम हिंदू है म्हणणाऱ्या ओबीसी समाजाला मराठा समाजाने शक्ति प्रदर्शन करून ताटातील सोडा तोंडातील घास हिसकावून घेतला.त्यामुळे ओबीसी समाजा समोर हिंदू धर्माचा एक नियम लागू होत आहे.बाप दाखव नाहीतर श्रद्धा घाल सर्वसामान्य कुटुंबातील आणि कोणतीही राजकीय पाश्वभूमी नसलेल्या मनोज जरांगे पाटील यांनी शक्ति दाखवून राज्य सरकारला घुटणे टेकायला लावले. आपल्या समाजहित मागण्यांसाठी सांविधानिक मार्गाने आंदोलन करण्याचा भारतीय राज्य घटनेनुसार सर्वांनाच अधिकार आहे.आता पुढची लढाई ओबीसी समाजातील प्रत्येक समाज घटकाची आहे. म्हणूनच मी विश्वकर्मीय सुतार समाजातील सर्वच समाज नेत्यांना जाहीर सामाजिक आवाहन करतो.

आदर्श राज्यस्तरीय ओबीसी सुतार समाज.आदर्श ओबीसी सुतार समाजातील समाज नेते ओबीसी संदर्भात गांभीर्याने विचार करतील काय?. समाज सामाजिक क्षेत्र हा शब्दप्रयोग आला म्हणजे समाज नेतृत्व हा शब्दप्रयोग आलाच.विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाज नेत्यांना सुतार समाज बैठकीचे जाहीर नम्र आवाहन करतो.विद्वानांसाठी समाज जाणकारांसाठीच विशेष कर्तबगारांसाठी ओबीसी सुतार समाज बैठक घेण्यासाठी जागरुक चिकित्सक बुद्धिप्रामाण्यवादी आणि संवेदनशील समाज नेत्यांना जाहीर आवाहन आहे.विशेष विश्वकर्मीय सुतार समाजातील सर्वच समाज नेत्यांना जाहीर सामाजिक आवाहन.

ओबीसी संदर्भात विविध मुद्द्यावर सामाजिक विचारविनिमय करण्यासाठी बैठकीचे आयोजन समाज नेत्यांचा प्रतिसाद अपेक्षित आहे.मराठा आंदोलनाच्या सर्वच मागण्या सरकारने तातडीने मान्य करणे आणि सगेसोयरे यांना सुद्धा सरसकट प्रमाणपत्र देणे या संदर्भात ओबीसी विश्वकर्मीय सुतार समाज म्हणुन विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाज नेत्यांची सगेसोयरे या शब्दाचा आधार घेऊन कायदेशीर भूमिका आणि पुढील दिशा ठरवण्यासाठी येत्या १० फेब्रुवारी २०२४ रोजी चिखली बुलडाणा येथे समाज चिंतन विचार मंथन विचारविनिमय चर्चा करण्यासाठी समाज नेत्यांना एकत्रित करून बैठकीचे आयोजन करतो गट तट बाजुला करा आणि एकत्रित या.



या समाजहिताच्या बैठकीसाठी उपस्थित राहणाऱ्या विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाज नेत्यांनी आपले नाव आणि मोबाईल नंबर द्यावा.या बैठकीला राज्यातील राज्यस्तरीय समाज नेत्यांचा प्रतिसाद मिळत असेल तर ? सदर विश्वकर्मीय सुतार समाज नेत्यांसाठी समाजहित बैठकीसाठी स्नेह भोजनाची,बैठक व्यवस्था मात्र मी माझ्या कुवतीनुसार करतो.राज्यस्तरीय समाज संघटना यांचा अंदाजे आकडा किमान २०० च्या जवळपास असेल कारण समन्वय समितीकडे राज्यातील अंदाजे किमान १५० च्या जवळपास संघटनेचे अस्तीत्व असलेल्या संघटनेचा आकडा आहे. असा माझा अंदाज आहे आणि इतर काही किमान ५० च्या जवळपास समाजातील संघटना त्यांचे स्वयंघोषित नेते असतील असा माझा एक सरासरी सामाजिक अंदाज आहे.त्या हिशेबाने विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाज संघटना नेत्यांचा प्रतिसाद मिळाला तरच अपेक्षित प्रतिसाद मिळाला तर.सदर नियोजित समाजहित बैठकीचे नियोजन केले जाईल उगाचच फक्त दोन चार पाच समाज नेत्यांचा प्रतिसाद मिळत असेल,तर उगाच गाव भर डिनढोरा पिटण्यात काही अर्थ नाही.त्या पेक्षा शांत बसून तमाशा बघणे ठीक राहील. अशा समाजासाठी समाजहित म्हणून बैठकीचे आयोजन नियोजन न केलेले फारच उत्तम ठरेल असं माझं स्पष्ट मत आहे. हा माझ्या घरचा कार्यक्रम नाही.एक सर्वसामान्य ओबीसी सुतार समाज बांधव म्हणून मी हा पुढाकार घेत आहे. कारण या निर्णयामुळे मी अस्वस्थ आहे, करीत या विषयी चर्चा व्हावी संवाद व्हावा,चिंतन व्हावे ही अपेक्षा करतो.त्यासाठी प्रत्येकाच्या हातात मोबाइल आहे.८६०५५६९५२१ नंबर डायल करा आणि आपले निर्भीड निपक्षपाती मत व्यक्त कर. हीच हात जोडून कळकळीची विनंती करतो.

*********

प्रमोद सूर्यवंशी संपर्क:-
८६०५५६९५२१
चिखली मातृतीर्थ बुलडाणा.!

# मुस्लीम-ख्रिश्चन जात्यात!.मग बहुजन सुपात नसतील?

दैनिक मुक्तनायकच्या गेल्या रविवारच्या अंकातील 'जे आहे ते' या सदरातील 'दगडात प्राण फुंकणार! माणसांचा प्राण घेणार!!' हा संपादकीय लेख महाराष्ट्रातील असंख्य वाचकांना पसंतीस आला. काहींनी प्रत्यक्ष भेटीत, काहींनी फोन करून तर काहींनी व्हॉटस ॲपवर मेसेज करून अभिनंदन केले. संपादकांच्या धाडसाचे विशेष कौतुक केले. राष्ट्रवादीचे आमदार, माजी मंत्री जितेंद्र आव्हाड यानी राम हा मासांहारी होता अशी इतिहासात नोंद असलेली माहिती दिल्यानंतर विशेषतः आरएसएसच्या भाजपसह विविध संघटनातील रामभक्तांनी आक्रस्ताळपणा केला. आव्हाडांचे पुतळे फुंकले. राम काय पण रामभक्त असलेले देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, देवेंद्र फडणवीसांच्या विरोधातही जो कोणी आवाज काढेल त्यांच्या विरोधात मोहिमच उघडली आहे. विशेष म्हणजे २२ जानेवारीला राम प्राण प्रतिष्ठाच्या कार्यक्रमाच्या २४ तास अगोदरच रामभक्तांना न आवडणारे रामाच्या मुर्तीत प्राण प्रतिष्ठाचे विश्लेषण करणे कोणा येड्या-गबाळ्याचे धाडस नव्हे, त्यास वाघाचे काळीज लागते. ते महान कार्य प्रस्तुत संपादकांनी आपल्या जीवाची पर्वा न करता जे आहे ते मांडणी करून केल्यासंबंधी अनेकांनी प्रतिक्रिया दिल्या. दै.मुक्तनायक व्हॉटस् ॲप व अन्य सोशल मिडीयावरून महाराष्ट्रातीलच नव्हे, तर देशातील पुरोगामी, परिवर्तवादी, बुध्दिस्ट वाचत आहेत. अनेकांनी आमच्या जिल्हयात मुक्तनायक सुरू करावा अशी मागणी केली आहे. या सर्वांचे आभार, धन्यवाद. पण केवळ वाचून चालणार नाही, तर दै.मुक्तनायकमधून संपादकीयसह इतर जितकेही प्रबोधनिय लेख प्रसिध्द होतात ते स्वतःमध्ये परिवर्तन करण्यासाठी असतात. वाचकांनी स्वतःला बदलले पाहिजे, तरच मनुस्मृतीचे रामराज्य येणार नाही. संविधानाचे प्रजाराज्य टिकेल. ज्यात शुद्र म्हणजेच बहुजनांची सर्वांग प्रगती होणार आहे. बहुजन 'राजा' होणार आहे.

जगात बुध्दांचा देश म्हणून ओळखल्या जाणार्या विज्ञानवादी भारतात २२ जानेवारीला धर्मनिरपेक्ष देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदींनी दगडात प्राण फुंकला. रामाला जीवंत केले. पण खरेच दगडात प्राण आणला का? प्राण आणला असेल तर कुठे आहे तो राम? आम्हाला त्यास भेटून देणार का? अशी प्रश्ने जगातील लोक विचारत आहेत. भारतातील विज्ञानवादी प्रजेने काय उत्तर द्यायचे? माना खाली घालायची वेळ आणली मनुवादी रामभक्तांनी. जर दगडात प्राण आणलाच असेल तर माणसांची प्रेतेही स्मशानात येण्याऐवजी दगडात प्राण फुंकता येतो असा दावा करणार्यांकडेच नेली पाहिजे. म्हणजे मेलेल्या मुडद्यातही प्राण फुंकला की खेळ खल्लास. पुन्हा माणसं जीवंत. रडा-रडीची भानगडच नाही. शंभरदा खोटे बोलले की ऐकणार्यांना खोटं हळू हळू सत्य वाटू लागते. हे टेक्निक खोटं हे सत्य करणार्यांना चांगले माहित आहे. प्राण प्रतिष्ठाच्या अर्थाचा उलघडा करण्याचे काम विशेषतः वर्तमानपत्रे व टिव्हीवर दिसणार्या न्यूज चॅलनवाल्यांचे होते. पण जे आरएसएसचा धर्म मानून व सरकारचे बटीक होवून पत्रकारिता करत आहेत त्यापैकी कोणीच त्यावर भाष्य केले नाही. उलट प्राण प्रतिष्ठा हा कसा योग्य शब्द आहे अशा पध्दतीच्या बातम्या पेरल्या. आपले प्रेस रिपोर्टर आयोध्याला बातमीसाठी पाठवले. त्यापैकी एबीपी माझा या मराठी वृत्तवाहिनीची रिपोर्टर ज्ञानदा कदम ही बाई आयोध्याला बातम्या करायला गेली होती की दगडात प्राण फुंकायला गेली होती? तेथे जावून रामभक्तीपोटी रडायला लागली. तिचं रडणं बघून लोकांना हसायला येवू लागले. मुर्ख लोक पत्रकार असतील तर लोक येडी होवून चिध्यांच फाडत बसणार आहेत. ते मुर्ख तर आहेतच पण एक नंबरचे उंडगे पत्रकार आहेत. स्वतःला धंद्यावर लावणार आहेत आणि त्यांचे वर्तमानपत्र व वृत्तवाहिनी पाहण्यार्यांनाही धंद्याला लावणार आहेत. खोट्या बातम्या पेरणार्या पत्रकारांना उंडगे म्हणायचे नसेल, तर पोटासाठी वारंगणांचा व्यवसाय करते म्हणणार्या महिलेलाही उंडगे म्हणण्याचा कुणाला अधिकार नाही. भारताची विज्ञानवादी ओळख पुसून जावू नये यासाठी लोकांनी अलर्ट राहिले पाहिजे. लढण्यास सज्ज झाले पाहिजे.

आमदार जितेंद्र आव्हाड सारख्या अनेक विचारवंतांनी रामाचे विविध पैलू उलगडले. त्यामुळे रामभक्त चांगलेच खवळले. रामाच्या निगेटिव्ह चरित्रावर बोलायचे नाही अशी सक्त तंबीच दिली जात आहे. रामाच्या मंदिरात मांसाहारी लोकांसाठी प्रवेश निषध्द मानल्याने आव्हाडांनी राम शाकाहारी होता की मांसाहारी हा मांडलेला मुद्दा जसा महत्वाचा होता तसे शुद्र (हिंदू धर्मात जातील विभागलेल्या खाटीक, बुरूड, महार, मांग, मांग गारूडी, संत मातंग समाज, चांभार, चर्मकार, संत रोहिदास समाज, भंगी, संत म्हेत्तर समाज, ढोर, वीर ककय्या समाज सारख्या अस्पृश्य (एससी प्रवर्ग) जाती., धनगर, ओतारी सारख्या भटक्या (एनटी प्रवर्ग) जाती, रामोशी, बेरड, कुलगुटकी, कोचीकोरवी, कोरवी, कैकाडी, भाट, कंजराभाट, जोशी सारख्या भटके विमुक्त जमाती समुहातील (व्हीजेएनटी प्रवर्ग) जाती. तसेच लोहार, सुतार, कुंभार, लोणार, सोनार, कासार, न्हावी, शिंपी, परिट, धोबी, कोष्टी, साळी, माळी, गवळी, तेली, वाणी, तांबोळी इत्यादी (ओबीसी प्रवर्ग) शेकडो जाती, सनगर, कोळी, महादेव कोळी सारख्या (एसबीसी प्रवर्ग) जाती. अशा शुद्र, भटक्या व अस्पृश्य, वनवासी मिळून सुमारे ६ हजार सहाशे जातीचे लोक) रामाचा फोटो डोक्यावर घेवून नाचत आहेत, अशाना सांगणे महत्वाचे आहे. रामाने तुमच्या मूळनिवासी समाजाचा आदर्श ऋषी शंभूकाचा खून का केला? शंभूक हा शुद्र वर्णातील होता. ऋषी शंभुकाने प्राप्त केलेले धर्मशास्त्र रामाच्या धर्मशास्त्र खिलाफ होते. त्याचे ज्ञान ब्राम्हण वर्णासाठी अशुभ आहे. ब्राम्हण वर्णातील एका बालकाला अकाली मृत्यु आला, असे रामाच्या डोक्यात भरवले आणि रामाने शुद्र शंभूकाचा खून केल्याचा काही रामायण ग्रंभामध्ये मांडल्याचा इतिहास व रामाने बहुजन राजा रावणाची बहिणी शूर्पणखा हिचे नाक कापले हा व इतर इतिहास सांगायला नको का? पण सत्य इतिहास सांगितला तर शुद्र जागे होतील. शुद्रांना सत्य इतिहास समजू नये म्हणूनच जितेंद्र आव्हाडसारख्यांना ठार मारण्याच्या धमक्या देवून इतर शुद्रावर दहशत बसवणे. जेणेकरून शुद्रांनी रामालाच मानले पाहिजे, शुद्रांनी आमच्याच धर्मात राहून धर्माचे रक्षण केले पाहिजे. तथापि, शुद्रांना रामाच्या धर्मात कधीच मानाचे स्थान मिळणार नाही. जो कोणी ऋषी शभूंकासारखा शहाणा, विज्ञान होईल त्याचा खून केला जाणार आहे. क्रांतिबा जोतिराव फुले व क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जमान्यात भारतात ब्रिटीशांची सत्ता होती म्हणून बरे झाले. अन्यथा क्रां.जोतिराव फुले व क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले या शुद्रांनी आपल्या समाज बांधवाना शहाणे करण्याच्या शाळा काढणे हा धर्मशास्त्राचा भंग केला म्हणून, तर मनुस्मृतीमध्ये बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारखा अस्पृश्याने उच्च शिक्षण घेणे हा गुन्हा ठरवून त्यांचे प्राण घेतले असते.

बाबरी मशिद-राम मंदिर मुद्दा उकरून काढल्यापासून देश,धर्म व संस्कृतीचा शत्रू मुसलमान व ख्रिश्चन असल्याचे बहुजनांच्या डोक्यात भरवले जात आहे. त्यामुळे आजच्या घडीला मुसलमान हाच आपला एक नंबरचा दुश्मन असल्याचे बहुजनांना वाटत आहे. म्हणूनच अधून मधून देशात धार्मिक दंगली होत असाव्यात. राम प्रतिष्ठा कार्यक्रमाच्या निमित्ताने देशात अनेक ठिकाणी शोभा यात्रा काढण्यात आल्या. मुंबईतील मीरा भाईंदर येथे काढण्यात आलेल्या शोभा यात्रेतील रामभक्त बहुजनांनी मुस्लीमांची शोधून दुकाने बंद का केली नाहीत म्हणून नासधूस केली. मुस्लीमांना मारहाण केली. त्यामुळे काही मुस्लीमांना संताप येणे सहाजिकच आहे. त्यानी शोभा यात्रेवर हल्ला केला. पण पोलीसांना मुसलमानांचाच हल्ला दिसला. पण त्यानी हल्ला का केला ते जाणून घेतले नाही. पोलीसांनी तत्परता दाखवत हल्ला करणार्या संशयित मुसलमानांना अटक केली. त्याच्या पुढे जावून राज्यातील भाजपही असलेल्या सरकारमधील गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यानी कारवाई करण्याचे आदेश दिले. स्थानिक महापालिकाने मुसलमानाची रस्त्यावरचे व्यवसाय टार्गेट केलीत. विनापरवाना व्यवसाय थाटल्याने बुलडोझर लावून व्यवसाय तोडून टाकलीत. उत्तर प्रदेशातील संत कबीरनगर व आग्रातील एका मशिदवर रामभक्तांनी आपला भगवा ध्वज लावला. हे गैर कृत्य उत्तर प्रदेशातील भाजप सरकारला दिसले नाही का? आज मुस्लीम, ख्रिश्चन हे धर्म परकीय असल्याचे सांगून त्या धर्मातील लोकांना टार्गेट केले जात आहे. मशिद, चर्चवर हल्ला करण्याच्या घटना समोर येत आहेत. अशा हल्ल्यातून मुसलमान, ख्रिश्चन धर्मातील लोकांनी हिंदू धर्माचे वर्चस्व मान्य करावे यासाठी खटाटोप सुरू आहे. ब्राम्हण उध्दारक तथा आरएसएसचे द्वितीय सरसंघचालक माधव सदाशिव गोळवलकर यांनी १९३९ ला लिहिलेल्या 'वी ऑर अवर नेशनहूड डिफाइन्ड' पुस्तकात आपल्या धर्म आणि संस्कृतीच्या सरंक्षणासंबंधी काही मते मांडली आहेत. गोळवलकरांच्या मते, 'हिंदुस्तान हिंदूंचे आहे आणि त्यामुळे इतर अल्पसंख्याकांना येथे राहायचे असल्यास त्यांनी हिंदूंचे वर्चस्व स्वीकारले पाहिजे.' एकदा का येथील मुसलमान व ख्रिश्चनानी हिंदू धर्माचे वर्चस्व स्वीकारले की मग मात्र मोर्चा हिंदू धर्मातील वर उल्लेख केलेल्या अल्पसंख्यीय जातींच्या बहुजनांकडे वळवला जाईल., जे आज गोळवणकरांच्या विदेशी आर्य धर्माचा झेंडा घेवून थय थय नाचत आहेत.

मनुस्मृती या कायदे कानून ग्रंथात शुद्र म्हणजेच बहुजनासंबंधी कायदे केले आहेत. त्या कायद्यानुसारच हिंदू धर्मात बहुजनांचे स्थान असेल अशी सक्त सूचना आहे. प्रथम बहुजनासंबंधी मनुस्मृतीमधील निवडक कायदे जाणून घेवू. १.मनात कोणत्याही प्रकारचा किंतु न आणता ब्राम्हणाने शुद्राच्या वस्तु आपल्या ताब्यात घ्याव्यात. कारण स्वतःची चीजवस्तू शुद्राला नसते. तो गुलाम आहे व त्याची जी काही जीचवस्तू असेल तिच्यावर त्याचा हक्क नसतो. त्याच्या धन्याचा असतो (अध्याय-८, श्लोक-४१७), २.शुद्र धनसंचय करण्याला समर्थ असला तरी त्याने संपत्ती कमावू नये. कारण शुद्राजवळ असलेली संपत्ती पाहिल्याबरोबर ब्राम्हणाच्या चित्ताला वेदना होतात (अध्याय-१०, श्लोक-१२९), ३. त्रैवर्णिक (ब्राम्हण, क्षत्रिय व वैश्य) या वर्णात जातीत जन्मलेल्या स्त्रीबरोबर एखाद्या शुद्राने संभोग केला तर त्या स्त्रीला पालक असो वा नसो त्या शुद्राचे लिंग कापून टाकावे. त्या स्त्रीला पालक नसेल तर त्या शुद्राची सर्व मालमत्ता जप्त करावी व त्याला देहांताची शिक्षा करावी.(अध्याय-८, श्लोक-३७४), ४.एखाद्या शुद्राने सर्वात वरिष्ठ जी जात आहे त्याच जातीतील मुलीच्या (ब्राम्हण मुलीच्या) प्रेमाची याचना केली तर त्यास देहांताची शिक्षा द्यावी (अध्याय-८, श्लोक-३६६), ५.१२. धन्याने शुद्राला स्वतःच्या नोकरीतून मोकळे केले असले तरी तो शुद्र आपल्या गुलामगिरीतून मुक्त होवू शकत नाही. कारण गुलामगिरी ही त्याच्या जन्माची सोबतीण आहे. मग त्याच्यापासून तिला कोण मुक्त करू शकेल? (अध्याय-८, श्लोक-४१२-४१४), ५.ब्राम्हणाची सेवा करणे हाच शुद्रांचा उत्तमोत्तम धंदा होय, असे सर्वांचे मत आहे. कारण त्या व्यतिरिक्त त्याने दुसरा धंदा केला तर त्यामुळे त्याचा काही फायदा होणार नाही., जो शुद्र आपली सेवाचाकरी करतो, त्याची कुवत, हुशारी आणि कुटुंबस्थिती याबद्दल चौकशी करून त्या मानाने ब्राम्हणांनी घरातील वस्तुतून काही वस्तू त्या शुद्रांचे संगोपन करण्यासाठी दिल्या पाहिजेत., घरात शिल्लक राहिलेले अन्न, जुने कपडे, कुजके धान्य आणि जुनी लोकडी आसने ही ब्राम्हणांनी आपल्या शुद्रास नोकरास द्यावीत. (अध्याय-१०, श्लोक-१२१-१२५) ६.ब्राम्हणाचे मंगलसूचक, क्षत्रियाचे सत्तासूचक, वैश्यांचे संपत्तीसूचक आणि शुद्राचे तिरस्कारदर्शक असे प्रत्येकाचे नाव असावे., ब्राम्हणाचा प्रगतीदर्शक, क्षत्रियाचा सुरक्षादर्शक, वैश्याचा संपत्तीदर्शक आणि शुद्राचा सेवादर्शक असा प्रत्येकाचा उत्कृष्ट गुण असावा. (अध्याय-२, श्लोक-३१-३२). माधव गोळवलकर यांनी लिहिलेल्या 'बंच ऑफ थॉटस' व 'वी ऑर अवर नेशनहूड डिफाइन्ड' सारख्या पुस्तकात मांडलेली मते कृतीत आणली जात असतील, तर एकेकाळच्या रामराज्यात तयार केलेल्या मनुस्मृतीचे कायदे पुन्हा रामराज्य आले तर ते लागू होणार. म्हणून ते चुकीचे करत आहेत असे मी अजिबात म्हणणार नाही. ते लोक त्यांचा धर्म आणि संस्कृती वाढविण्यासाठी करणे सहाजिकच आहे. म्हणून शुद्रांनी म्हणजेच बहुजनांनी आपल्या विरोधाने भरलेल्या रामराज्याची संस्कृती आणण्यासाठी झटायचे का? याचा पहिला विचार केला पाहिजे. राम प्रतिष्ठा विजय दिन साजरा करणारे सर्वाधिक शुद्रच होते. २६ जानेवारीच्या दैनिक मुक्तनायकमधील प्रस्तुत संपादकांच्या अग्रलेखात उदाहरणदाखल बहुजन समाजातील जातीच्या लोकांनी आपल्या वस्तीत विजय दिन साजरा केल्याचे फोटो प्रसिध्द केलेत. त्या समाजातील रामराज्यला विरोध करणार्यांनी आपल्या त्या समाजबांधवांना समजावले का? प्रसंगी त्यांना विरोध केला का? दोन हात केले का?

एकदा का रामराज्य आले तर मनुस्मृतीचे कायदे नव्या स्वरूपात लागू होणार आहेत. माधव गोळवलकर यानी स्वतंत्र भारतीय संविधान हे पाश्चात देशाच्या घटनांचा परिपाक असल्याचे सांगून संविधान नाकारले पाहिजे असे मत मांडले आहे. त्यामुळे आजचे आरएसएसवाले व रामभक्त संविधानाला पर्याय मनुस्मृतीसदृश्य नवीन संविधान लागू करतील. सम्राट अशोक मौर्यानी स्थापन केलेल्या बौध्द संस्थानमध्ये गणराज्य पध्दत होती. सर्वांना समान अधिकार होते. पण ते तत्कालिन माधव गोवळलकराच्या समाज बांधव व विचारधारेंच्या लोकांना मान्य नव्हते. संधी येताच पुष्पमित्र शुंगाने मौर्यांचे संस्थान उलथून टाकले. ब्राम्हण, क्षत्रिय व वैश्यांच्या भल्याचे 'रामराज्य' आणले. नरेंद्र मोदींना प्रिय असलेले सरदार वल्लभभाई पटेल हे भाजपत्तर असल्याने त्यांची उत्तर प्रदेशातील उज्जेनमधील मुर्ती तोडायला रामभक्तांनी कमी केले नाही तेथे बहुजनांचे हक्क आणि अधिकार काढून घ्यायला ते मागे पुढे पहाणार नाहीत. त्यांचे संविधान तयार आहे हे आता लपून राहिलेले नाही. सन २०२४ ची लोकसभा निवडणुकीत भाजपला बहुमत मिळाले तर लोकराज्य नसेल ना निवडणूक मताचा अधिकार. निवडणूक मताचा अधिकार गेला तर मागासांच्या दारात उच्च जातीतील उमेदवार काय पण त्यांचे कुत्रं की मांजरही हागायला येणार नाही. बहुजनांना संविधानाने जितके काही दिले आहे ते यापुर्वी कधीच मिळाले नव्हते. म्हणूनच देश, संविधान व लोकसत्ता टिकवणे काळाची गरज आहे. त्यासाठी छातीचा कोट केला पाहिजे. बाबासाहेबांनी सांगितल्याप्रमाणे धर्मांतर केले पाहिजे. आपला मूळ बौध्द धम्मात आले पाहिजे. आज ज्यांना आरएसएस, गोळवलकरांचा धर्म, संस्कृती, मनुस्मृती समजली आहे त्यानी ते नाकारले पाहिजे. त्याची सुरूवात दिवाळी, दसरा,शिमगा इ. सर्व सण नाकारून केली पाहिजे. देशाचे राष्ट्रीय सणासह आपले सण साजरे केले पाहिजेत. आपल्या नातेवाईक, मित्रमंडळाना मनुवाद्यांचे धोक सांगितले पाहिजेत. पण गळ्याला आल्याचे आमच्यासारखे कोणीतरी पुराव्या देवून सांगत असताना, दैनिक मुक्तनायक आपले सण साजरे करणे किती महत्वाचे आहे आणि ते कसे साजरे केले पाहिजे इथवर सांगत असतानाही किती बहुजनांनी आपल्या घरात गोळवणकरांच्या धर्माचे सण बंद करून आपले सण सुरू केले? कालच्या प्रजासत्ताक दिनोत्सवाचेच उदाहरण घेवू. हा राष्ट्रीय सण असताना कित्येक बहुजनांनी त्याच दिवशी मेलेल्या व्यक्तीच्या मातीचा/जलदान विधीचा कार्यक्रम ठेवला होता. गेल्या वर्षी धम्माचे काम करणार्या एका प्राध्यापक धम्म विधीकर्त्यांने कोल्हापुरातील एका घरी जलदान विधीचा कार्यक्रम माता रमाई जयंती (७ फेब्रुवारी) दिनी ठेवण्यास त्या दुःखी कुटुंबाला सांगितले. मग बौध्द-बहुजनांच्या घरातून गोळवलकरांच्या धर्माचे सण हद्दपार होतील का? आतातरी वेळीच सावध झाले पाहिजे अन्यथा मुस्लीम, ख्रिश्चन आज जात्यात आहेत, भविष्यात सुपात असलेल्या बहुजनालाही जात्यात भरडले जाणार आहे. ते खर्या अर्थाने 'रामराज्य' असेल.

*********

देवदास बानकर
९२२५८०६९९०,


# भिमसैनिक असते तर प्रबुद्ध भारत दैनिक असते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी ३१ जानेवारी १९२० ला पाक्षिक मूकनायक सुरु केले होते त्याचा १०४ वा वर्धापनदिन ३१ जानेवारी २०२४ ला आहे त्यानिमित्ताने हा विशेष लेख देत आहे वाचकांनी तो वाचून निर्भीड,निपक्ष प्रतिक्रिया व्यक्त कराव्यात ही सुरवातलाच अपेक्षा करतो.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी बहुजन समाजात जागृती निर्माण करण्यासाठी अनेक वृत्तपत्रे व पाक्षिकांचे प्रकाशन आणि संपादन केले. त्यांना या वृत्तपत्र–पाक्षिकांनी बहुजन चळवळीला पुढे नेण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले. खरे तर डॉ.बाबासाहेब आंबेडकरच बहुजन पत्रकारितेचे आधार स्तंभ आहेत. ते बहुजन समाजाचे पाक्षिकाचे प्रथम संपादक,संस्थापक व प्रकाशक आहेत, त्यांच्या द्वारा संपादित वृत्तपत्र आजच्या पत्रकारितेसाठी एक मानदंड असायला पाहिजेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर द्वारा निघालेले वृत्तपत्र–पाक्षिकांची नावे वेळोवेळी बदललेल्या परिस्थितीनुसार नांव दिली आहेत. पाक्षिक मूकनायक म्हणजे न बोलणाऱ्यांना बोलण्याची संधी व नेतृत्वाची सुवर्ण संधी,बोलणारे लिहणारे आणि लढणारे झाले तेव्हा त्यांनी नांव दिले जनता,त्याचा बहुजन समाजात समानता असावी म्हणून नांव दिले समता,जेव्हा हाच बहुजन समाज बहिष्कृत होता तेव्हा त्यांनी नांव दिले बहिष्कृत भारत.आणि बहिष्कृत भारतातून जेव्हा आम्ही बाहेर आलो तेव्हा प्रबुद्ध भारत.

प्रबुद्ध भारत हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर सुरू केलेले शेवटचे वृत्तपत्र होते. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धम्माची दीक्षा घेतली तेव्हा पाच कोटी लोक होते असे म्हणतात.बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणा नंतर हे पाक्षिक बंद पडले.बुद्ध धम्माची दीक्षा घेतल्यामुळे समाजात प्रचंड बदल झाला असावा.कारण महार समाजाचे लोक भिमसैनिक झाले असावे. लाखो करोडो भिमसैनिक असल्यामुळे पाक्षिक प्रबुद्ध भारत दैनिक प्रबुद्ध भारत झाले पाहिजे होते.बाळासाहेब ठाकरेचे (बाळ सैनिक) शिवसैनिक आहेत म्हणून सामना दैनिक आहे.डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे भिमसैनिक असते तर प्रबुद्ध भारत दैनिक आज असते.

११ एप्रिल २०१७ रोजी महात्मा ज्योतिबा फुले जयंतीचे औचित्य साधीत बाबासाहेबांचे नातू प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांनी प्रबुद्ध भारत हे पाक्षिक नव्या स्वरूपात पुन्हा प्रकाशित करण्याचे जाहिर केले व १० मे २०१७ रोजी याचा पहिला अंक प्रकाशित झाला. तो आज पर्यंत त्यांच्या पक्ष संघटनेचे मुखपत्र झाला आहे.भारिप बहुजन महासंघ ते वंचित भक्तांच्या पलीकडे तो भिमसैनिकाचा पाक्षिक (दैनिक) होऊ शकला नाही.आजच्या घडीला वंचित बहुजन आघाडी पक्ष राज्यात लक्षवेधी आणि समाजाला प्रेरणा देणारा आहे. खऱ्या अर्थाने तोच बहुजनाचे नेतृत्व करीत आहे.जिल्हा परिषद,पंचायत समिति,विधानसभा,लोकसभा सर्वच मतदार संघात त्यांची मतदान संख्या दखल पात्र आहे. कार्यकर्त्यांचे खेड्या पड्यात शहरी भागात कार्यकर्त्यांचे भक्कम जाळे आहे. त्यात सुशिक्षित कमी आणि अशिक्षित मोठ्या संख्याने भक्त अनुयायी सैनिक खूप आहेत. कामगार






कर्मचारी अधिकारी संघटित कमी असले तरी असंघटित कामगारांची संख्या लक्षवेधी आहे. या एकूण सर्व संख्याच्या बळावर प्रबुद्ध भारत दैनिक असायला पाहिजे होते.पण ते का नाही यांचे गांभीर्याने आत्मचिंतन परीक्षण होणे आवश्यक आहे. इतरावर टीका टिपणी करण्या अगोदर या भिम सैनिकानी प्रबुद्ध भारत दैनिकाबाबत ठोस भूमिका घेणे आवश्यक आहे.एका वैचारिक पक्षाचे मुखपत्र आर्थिक दुष्टिने सामाजिक बांधिलकी ठेऊन पत्रकारिता करणाऱ्या तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली प्रकाशित झाले तर त्याला एका उद्योग धंद्याचे व्यवसायीक स्वरूप देता आले पाहिजे. शॉट कट मारून ते अशक्य आहे. योजनाबद्ध नियोजन बद्ध काम केल्यास भिमसैनिकांचे प्रबुद्ध भारत दैनिक होऊ शकते. त्यासाठी संविधानिक मूल्य मान्य असली पाहिजेत.नियमाचे काटेकोरपणे पालन करावे लागेल.तरच ते यशस्वी वाटचाल करू शकते.

आंबेडकरी चळवळीत बातम्या देणारे पेपर खूप आहेत.त्यांना आपण शुद्ध मराठीत वृत्त देणारे पत्र म्हणजे वृतपत्र म्हणतो. पण बहुजन समाजाची योग्य दखल घेऊन त्यावर वैचारिक लढा उभारून सडेतोड उतर देणारे एकही दैनिक नाही. रोखठोक,निर्भीडपणे,निपक्षपाती लिहणे अपेक्षित असते.चुकीचे वागणाऱ्या नेत्यांना त्यांची भूमिका कशी वैचारिक पातळीवर चुकीची आहे.हे सांगण्याचे काम वैचारिक पातळीवर संपादक बुद्धीजीवी विचारवंतानी केलेच पाहिजे.ते होत नसल्यामुळेच आंबेडकरी चळवळीत संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष जास्त जन्मा येत आहेत.त्याकारणाने गल्ली बोळात स्वयंघोषित नेते झाल्यामुळेच चळवळ व समाज दिशाहीन झाला आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, कोणतीही चळवळ यशस्वी करण्यासाठी त्या चळवळीचे वर्तमानपत्र असावे लागते. ज्या चळवळीचे वर्तमानपत्र नसते, तीची अवस्था पंख तूटलेल्या पक्षाप्रमाणे होते. हे वाक्य वापरून ज्यांनी ज्यांनी पत्रकारिता केली, त्यांचे क्रांतिकारी विचारांची चळवळ उभी करणे हे उदिष्ट कधीच नव्हते.त्यांनी शब्दात शहाणपण,विचारात निष्ठा, वर्तनात चारित्र्य या ब्रिदवाक्यनुसार चळवळीतील कार्यकर्ते,नेते याची दररोज चे जगण्याची साधन आणि पद्धत जवळून तपासली पाहिजेत.समाजातील असे कार्यकर्ते नेते कोणती चळवळ चालविणार आणि मग त्यांना कोणत्या चळवळीला यशस्वी होण्यासाठी तिला वर्तमानपत्राची आवश्यकता लागेल. ज्या चळवळीचे वर्तमानपत्र नसेल तिची अवस्था पंख तुटलेल्या पक्षाप्रमाणे होते.डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे वाक्य सांगून फक्त वैचारिक लेख प्रसिद्ध करीत राहिलो.तर क्रांतिकारी विचारांची अंमलबजावणी कोणी करावी?. कधी करावी?. कशी करावी?. हेच ठरत नसल्यामुळे आंबेडकरी विचारांची क्रांतिकारी चळवळ मात्र आज ही पंख तुटलेल्या पक्षा प्रमाणे होती त्यापेक्षा दिशाहीन झाली आहे. म्हणूनच शिस्तबद्ध भिमसैनिकांचा दैनिक प्रबुद्ध भारत हवा आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मूकनायक १०४ व्या वर्धापनदिना निमित्य हार्दिक शुभेच्छा देताना अपेक्षा लाखो वाचक करतात.


आंबेडकरी विचारधारा मानणारे चळवळीतील राज्यात आज अनेक वृतपत्रे आहेत. जे आर्थिक संकटावर मात्र करून जिल्हा पातळीवर पंधरा अठरा वर्षापासून नियमितपणे दैनिक प्रकाशन करीत असतात. त्यात आत्मचिंतन आणि आत्मपरीक्षण करणारे अनेक लेख मी नियमितपणे लिहतो. त्यामुळे मी ज्या असंघटीत कष्टकरी कामगारांच्या न्याय,हक्क व प्रतिष्ठे साठी झटणारी सत्यशोधक कामगार संघटना संलग्न स्वतंत्र मजदूर युनियन चे काम करतो.असंघटित कामगार लोक कसे जगतात,त्यांना रोजीरोटीसाठी काय काय करावे लागते. याचा कोणीच विचार करीत नाही.तरी हाच झोपडपट्टीत राहणारा असंघटीत कष्टकरी समाज आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते,नेत्या सोबत अन्याय अत्याचार आणि पुतळा विटंबना झाल्या नंतर कोणत्याही आंदोलनात सर्वात पुढे असतो.तोच खरी चळवळ पुढे आणि मागे नेतो.त्याला शिस्तबद्ध भिमसैनिक म्हणून उभे केल्यास अनेक समस्या चुटकीसरशी सुटतील आणि भिमसैनिकांचे प्रबुद्ध भारत दैनिक चळवळीला योग्य दिशा दाखवून योग्य दिशेला घेऊन जाणार त्यासाठी इच्छाशक्ती हवी,तीच बुद्धीजीवी विचारवंतानी दाखविली पाहिजे. असे मला वाटते.लाखो करोडो भिमसैनिक अनुयायी,भक्त, शिष्य आहेत.पण शिस्त नसेल तर काय कामाचे?.क्रांतिकारी आंबेडकरी विचार मान्य असणाऱ्यांनी गांभीर्याने विचार करावा,चर्चा, संवाद,मैत्रीभावना जागृत करावी आणि सकारत्मक विचारांची उर्जा असेल तर संपर्क करावा. जागरूक वाचकांना पाक्षिक मूकनायक १०४ व्या वर्धापनदिनाच्या हार्दिक शुभेच्छा.

*********

आपला
सागर रामभाऊ तायडे,भांडूप–मुंबई
–९९२०४०३८५९,
अध्यक्ष – सत्यशोधक कामगार
संघटना संलग्न स्वतंत्र मजदूर युनियन महाराष्ट्र राज्य.

# अडाण्यांनी वाचला मुकनायक

मुकनायक वृत्तपत्र सुरू करून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी एक अनोखी क्रांती करून प्रस्थापितांना धक्का च दिला. भारतामध्ये अनेक परकीय आक्रमण झाले, देशावर सत्तेसाठी राज्य केले, कोणी व्यापार करून आर्थिक लुट केली. हे देशासाठी घातक होतेच पण त्यापेक्षा ही घातक होते ते म्हणजे देशातच विषमता मजबूत करून माणसाला माणसापासून दुर ठेवणे, माणसाला शिक्षण, जागृती ज्ञानापासून व विकासापासून दुरच ठेवणे नव्हे तर शिक्षण, ज्ञानार्जन करून जागृत होणाऱ्या माणसाला हिन लेखने, त्याला शिक्षणाचा, ज्ञानार्जनाचा अधिकाराच नाही असे विकृत विचार पेरून स्वतः चे पोठ भरण्याचे काम हजारो वर्षांपासून येथे सुरू होते. जनावरांच्या पाठीवर थाप आणि माणसाला माणसाचा स्पर्श म्हणजे पाप एवढे विकृत विचार पेरून स्वतः चे वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी व लोकांना मानसिक गुलाम बनवण्याची विकृती फक्त भारतातच होती. मनुस्मृती ला कायदा समजून जगातील सर्वात विकृत सामाजिक स्थिती निर्माण करण्याचे काम याच लोकांनी केले होते. स्वतः चे वर्चस्व स्वतः च्या गुणांवर, स्वतः च्या कतृत्वावर निर्माण करू न शकणाऱ्या लोकांनी लोकांना अज्ञानी ठेवून अंधविश्वासात ठेऊन एवढे बंधने लादुन दिली की आणि बंधनाचे पालन करणे यालाच धर्म संबोधले गेले. शुद्रांनी ब्राम्हणासह तिन्ही वर्णाची सेवा करणे हा धर्म आहे पण शिक्षण घेणे, ब्राम्हणासमोर उभे राहणे, वेद वाचणे याला पाप मानले जायचे. विषमता मजबूत करण्यासाठी जाती व्यवस्था निर्माण करून दिली आणि जातीच्या उतरंडी मध्ये कोणतीतरी जात आपल्या खाली आहे यायच समाधान मानण्याची मानसिकता विकसित झाली. परंतु जातीची उतरंड रचताना एका जातीचा भार दुसऱ्या जातीवर पडून मानुस त्रस्त होत आहे. आणि माणसाला त्रस्त करणारे नेमके कोण याबद्दल एकही चुकीचा शब्द बोलणे म्हणजे सर्वात मोठा गुन्हा ठरत असे. मुळात लोकांना अज्ञानात, अंधविश्वासात ठेवून त्यांच्या कमकुवत बाजुचा फायदा घेऊन आपले वर्चस्व निर्माण करणारे किती कमकुवत व निच माणसिकतेचे असतील याची प्रचिती येते. मनुस्मृती निर्मीत सर्व निच आणि माणसाला माणसा पासून दुर करणारे विचार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी झुगारून मानवतावाद व समतावाद प्रस्थापित केला. देशात परकीय सत्तेपेक्षा घातक अंतर्गत विचार व आचार आहेत आणि अंतर्गत विचार व आचार जो पर्यंत आपण बदलणार नाही तो पर्यंत माणसासह देशाची प्रगती होणे शक्यच नाही, हे ओळखून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी अंतर्गत गुलामी पासून स्वातंत्र्य मिळवण्याचा लढा उभा केला. कोणताही लढा यशस्वी करायचा असेल तर त्याला वृत्तपत्राची जोड असते म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी मुकनायक वृत्तपत्र सुरू करून या वृत्तपत्रातून विषमता, भेदभाव, अंधविश्वास या विरोधात लेखन करून समाजाला जागृत करण्याचे काम केले. हजारो वर्षांपासून ज्यांना शिक्षण, समता, हक्क अधिकार याचा गंधही नव्हता अशा परिस्थिती डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी वृत्तपत्र सुरू करणे म्हणजे खुप धाडसाचे काम होते. एक तर ज्या लोकांना जागृत करायचे त्या लोकांकडे शिक्षण नाही, त्यांना लिहता वाचता येत नाही, काही लोकांना लिहता वाचता आले तरीही डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे क्रांतीकारी व परिवर्तनवादी विचार एकदम पटतील की नाही याची खात्री नव्हती, कारण हजारो वर्षांपासून मानसिक गुलामीच्या माध्यमातून विषमता व अस्पृश्यता ही खुप बळकावली होती. बरेच लोक स्वतः च स्वाभिमानी जिवन जगण्याचे धाडस करत




नव्हते. तरीही डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी वर्तमानपत्र सुरू केले. वाचक, वर्गणीदार, जाहिरात वर्ग मिळेल की नाही याची कोणतीही पर्वा न करता आपले काम सुरू केले. बहुतांश अडाणी अशिक्षित लोक असुनही मुकनायक ने समाजात निर्भीडपणे जागृती करून विचार पेरण्याचे काम केले. एकशे चार वर्षा अगोदर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे अनुयायी शिक्षणाने कमी, संख्येने कमी आणि आर्थिक दृष्टीने कमकुवत असुनही डॉ बाबासाहेब आंबेडकर चार वर्तमानपत्र सुरू करून विचार पेरण्याचे काम करतात. परंतु डॉ बाबासाहेब आंबेडकर गेल्या नंतर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुळे शिक्षण, नोकरी, सन्मान, स्वाभीमान व समता मिळाली, पुर्वीची परिस्थिती कल्पनेपेक्षा जास्त बदलली. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने अनेक सामाजिक, शैक्षणिक, राजकीय संघटन उभे राहीले, हजारो नेते झाले परंतु यामध्ये कुठे च आंबेडकरवादी विचार व आचार अपवाद वगळता दिसून आले नाही. कारण जेथे भारताचे उद्धारक म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचा जयघोष केला जातो तो फक्त जयजयकार करण्यासाठीच आहे. आचरना साठी नाही. अनेक लोक स्वतः ला राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय नेते समजून घेतात, देशभर, राज्यभर कार्यकर्ते आहेत म्हणतात परंतु देशभर, राज्य भर प्रत्येक अनुयायाच्या घरात जाईल असे वर्तमानपत्र एकही नेता सुरू करू शकला नाही. बर नेत्यांनी नाही सुरू केले तरी चालेल परंतु हजारो नेते असुनही ज्यांनी स्वतः च्या खर्चातून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारावर आधारित वर्तमानपत्र सुरू केले त्या वर्तमानपत्राला हातभार ही लावला नाही. प्रत्येक घरात वाचक असुनही प्रत्येक घरात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचे वर्तमानपत्र जात नाही. मग प्रश्न उभा राहतो की डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी जे विधान केले होते की कोणतीही चळवळ अथवा लढा यशस्वी करायचा असेल तर वर्तमानपत्राची गरज असते. येथे हजारो लोक चळवळीच्या नावाखाली स्वतः चे पोट भरत आहेत पण वर्तमानपत्रावर मात्र कोणी बोलत नाही, कोणताही नेता कोणत्याही आंबेडकरवादी विचारसरणीचे वृत्तपत्र घरात असावे, आपल्या कार्यकर्त्यांनी वाचावे असा आग्रह ही करत नाहीत. मग यांची चळवळ आहे तरी कोणती? अजून एक गंभीर स्वरुपाचा प्रश्न उपस्थित राहतो तो म्हणजे जे लोक स्वतः ला राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून घेतात त्या लोकांच्या घरी तरी आंबेडकरवादी विचारसरणीचे वर्तमानपत्र नियमित जाते का? दरवर्षी नाचगाण्यावर आणि मनोरंजनावर लाखों रुपये खर्च होत असतील आणि तेथे वर्तमानपत्र नसेल तर आपण कोणतीही चळवळ करत नसुन अधोगतीकडे जात आहोत याचे हे लक्षण नाही का? आज प्रत्येक घरात वर्तमानपत्र जाईल एवढी आर्थिक कुवत व प्रत्येक घरात वर्तमानपत्र वाचले जाईल एवढे शिक्षीत लोक असूनही आपण राज्य, देश पातळीवर स्वतः चे एक मोठे वर्तमानपत्र का निर्माण करू शकलो नाही? जे पोटतिडकीने काम करतात त्या वर्तमानपत्रांना जगवण्याची व घराघरात पोहचवण्याची जबाबदारी आपण का घेत नाही? विचार केला तर किती विदारक परिस्थिती आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर हे वर्तमानपत्राला चळवळीमधील एक अविभाज्य भाग समजायचे. म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी वर्तमानपत्र वगळून कधीच चळवळ केली नाही. आणि आज चळवळीच्या नावाखाली वळवळ करणाऱ्यांची संख्या वाढली कारण वर्तमानपत्र नाही. आजही देशात सामाजिक व राजकीय समस्या अनेक आहेत त्या समस्या कशा सोडवायच्या आणि समस्यांचे गांभीर्य घराघरात पोहचवण्याचे काम वर्तमानपत्र करत असते. परंतु वर्तमानपत्र च नसल्याने ज्यांचे आहेत ते लोक दाखवतील तेच आम्हाला महत्त्वाचे वाटणार यात काही शंकाच नाही. संविधान व संविधानीक हक्क धोक्यात आहेत, बुद्ध मुर्त्यांचे दैविकरण करून देव बनवले जात आहे, लेण्यावर बुद्ध मुर्तीचे दैविकरण सुरू आहे, कोरेगाव भिमाचा जयस्तंभाचा वाद न्यायालयात आहे. परंतु याबाबत कोणालाच गांभीर्य नाही. शिक्षण, आरक्षण, रोजगार फक्त कागदोपत्रीच आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर, भारतीय संविधान विरोधी लोकांचे वर्तमानपत्र विकत घेऊन वाचणारे काही स्वयंघोषित विद्वान म्हणातात हे पेपरवाले खऱ्या, निष्पक्ष व संविधान आणि हक्क अधिकार जागृती च्या बातम्या छापत नाहीत. परंतु हेच विद्वान आंबेडकरवादी विचाराचा पेपर स्वतः विकत घेणार नाहीत किंवा इतरांना ही घेण्याचे सांगत नाहीत. काही काही लोक तर डॉ बाबासाहेब आंबेडकर व संविधाना मुळे स्थायीक झाले आणि त्यांनी वाचन व विचारच सोडून दिले. आज वर्तमानपत्र व इलेक्ट्रॉनिक माध्यमासासाठी अनुकुल परिस्थिती असतानाही वाचक वाचत नाहीत, आणि पैसे असूनही वर्तमानपत्र चालवायला मदत करत नाहीत. म्हणून डोक्यात सहज येते लोक अडाणी आणि गरिब होते तरीही मूकनायक निर्माण होतो. आज लोक शिक्षीत व श्रीमंत असतानाही वर्तमानपत्राचा प्रचार आणि प्रसार होत नाही ही खंत एकशे चार वर्षांनंतर असेल तर या पेक्षा अडाणी व गरीब लोक चांगले त्यांनी मुकनायक वाचला.

**********

**विनोद पंजाबराव सदावर्ते**
**समाज एकता अभियान**
**रा. आरेगांव ता. मेहकर**
**मोबा: ९१३०९७९३००**

# कोरेगाव भीमाचा ऐतिहासिक जयस्तंभ ही राष्ट्रीय संपत्ती असून कुणाच्याही बापाची खाजगी मालमत्ता नाही..... दादाभाऊ अभंग चेंबूरमध्ये जनजागृती अभियान संपन्न

चेंबूर: कोरेगाव भीमा येथील शौर्याचे प्रतीक असलेला ऐतिहासिक जयस्तंभ ही राष्ट्रीय संपत्ती असून ती आंबेडकरी चळवळीची अस्मिता आहे. ती कुणाच्याही बापाची खाजगी मालमत्ता नाही. काही घुसखोर ही आमची खाजगी मालमत्ता आहे असे सांगून लोकांमध्ये संभ्रम निर्माण करीत आहे आहे हा संभ्रम दूर करण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रात जनजागृती अभियान राबविणे आवश्यक असून घुसखोरांचां पर्दाफाश केला पाहिजे. कोरेगाव भीमा येथील जयस्तंभ हा शौर्याचे प्रतीक असलेला ऐतिहासिक जयस्तंभ असून तिथे माळवदकर कुटुंबाने अतिक्रमण केले असून त्या विरोधात न्यायालयामध्ये लढा सुरू आहे. प्रकरण न्याय प्रविष्ट असल्याने मी त्यावर अधिक भाष्य करीत नाही. आपण संविधानिक न्यायालयावर विश्वास ठेवूया आपल्यालाच न्याय मिळेल असा विश्वास भीमा कोरेगाव विजयस्तंभ संरक्षण व संवर्धन समितीचे अध्यक्ष दादाभाऊ अभंग यांनी चेंबूर येथील दिनांक २७ जानेवारी २०२४ रोजी झालेल्या जनजागृती अभियानात व्यक्त केला. चेंबूर येथील विपश्यना बुद्ध विहारांमध्ये चेंबूर मधील लढाऊ तरुणांनी भिमा कोरेगाव जयस्तंभ अतिक्रमण संविधानिक न्यायालयीन लढा जनजागृती अभियाना अंतर्गत अभियान राबविण्यात आले त्यात दादाभाऊ अभंग यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास, पेशव्यांचा इतिहास, भीमा कोरेगावची लढाई व कोरेगाव भीमा येथील जयस्तंभ आणि जयस्तंभ परिसरातील झालेले अतिक्रमण आणि न्यायालय लढा याची विस्तृत माहिती सांगून या लढ्यामध्ये आंबेडकरी जनतेने तन, मन व धनाने सामील होऊन संपूर्ण महाराष्ट्रात या संवेदनशील व अस्मितेच्या विषयाची जनजागृती करावी असे आवाहन उपस्थितांना केले. सर्व उपस्थितांनी दोन तास दादाभाऊ अभंग यांचे मनोगत अत्यंत शांतपणे ऐकल्याबद्दल दादाभाऊ अभंग यांनी उपस्थितांचे आभार मानले. प्रथम पंचशील व बुद्ध वंदना घेऊन बौद्धाचार्य भरत अमृता गायकवाड यांनी कार्यक्रमाची सुरुवात केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळीतील विद्रोही कवी बबन सरवदे यांनी केले. या कार्यक्रमात आदिनाथ हिरवे, मंगेश आव्हाड, मानव शिदू ढोणे, सुहास सरवदे, मोहन कांबळे, संजयदादा शिंदे, सार्थक भुजबळ, भीमराव आनंदा आढाव यांनी तन मन धनाने साथ देणार असे सांगून प्रत्यक्ष या लढ्यात कृतीने साथ दिली. कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून आंबेडकरी चळवळीतील लढाऊ तरुण नेत्या जयाताई बनसोडे, आंबेडकरी चळवळीतील युवा नेते बाळराजे शेळके, संजयदादा शिंदे, लहू कांबळे, मोहन सोनवणे, विलास काळे, राज वाघमारे,



बौद्धाचार्य मंगेश आव्हाड होते. कार्यक्रमाला महावीर कांबळे, अनिल बैले, सुनील खैरनार, राज त्रिभुवन, संतोष साळवे, सचिन भुजबळ, सिद्धार्थ सुर्यगंध, मानव ढोणे, सुहास सरोदे, भीमराव आढाव, मोहन कांबळे,भीमराव सावंत, तानाजी कांबळे, निखिल गांगुर्डे, दीपक आढाव, दिनेश दिवेकर, नरेंद्र कांबळे, पांडुरंग बेले, आशिष कांबळे, अनुकूल इंगळे, अभिषेक इंगळे, वैभव गवारे, प्रतीक जाधव,आदित्य हाके, धम्मदीप कदम, रोहित कांबळे संदीप कांबळे, वैभव गवळी, पृथ्वीराज इंगळे, प्रथमेश वाघमारे, अविनाश बेले, योगेश शिंदे, राजेंद्र वाघमारे, सुमित दहिभाते, भीमराव कांबळे,निलेश भुजबळ, वेदांत कांबळे, देवेंद्र संजय शिंदे, सोनू बाजीराव लहाने, राम जगन्नाथ खरे, देवेंद्र गायकवाड, एडवोकेट अजय गायकवाड डॉक्टर सौरभ विलास गांगुर्डे आधी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी तृषभ आव्हाड,सुमेध गरुड,जयेंद्र गायकवाड,आकाश किरतकर,अक्षय देठे,संतोष साळवे, मयूर खांबे यांनी प्रचंड मेहनत घेऊन कार्यक्रम यशस्वी केला. जनजागृती अभियान आंबेडकरी चळवळीचा बालेकिल्ला असलेल्या सिद्धार्थ कॉलनी येथून सुरू झाल्याने त्याचे लोण संपूर्ण महाराष्ट्रात पसरेल असा विश्वास महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळीतील प्रसिद्ध विद्रोही कवी बबन सरवदे यांनी व्यक्त करून हा कार्यक्रम आयोजित करणाऱ्या सर्व तरुणांचे कौतुक करून आभार मानले व असेच जनजागृती अभियान संपूर्ण महाराष्ट्रात आंबेडकरी जनतेने राबवावे असे आवाहन केले.

# किनवट येथे मराठा आरक्षण विजयी मिरवणूक



किनवट.ता. प्रतिनिधी शेख शौकत : गेल्या अनेक महिन्यापासून मराठा आरक्षण योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मराठा आरक्षणासाठी शांततेच्या मार्गाने आंदोलन चालू होते. आज वाशी येथील आंदोलन स्थळी मुख्यमंत्री व त्यांचे सहकारी मंत्रिमंडळ व वरिष्ठ अधिकारी यांनी मनोज जरांगे पाटील यांना राजपत्र देऊन त्यांच्या जवळपास पूर्णच मागण्या मान्य केल्याचे सांगितले. गरजवंत मराठ्यांना आरक्षणाचा लाभ होणार असून त्या खुशीमध्ये किनवट येथे जिजामाता चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक भव्य आरक्षण विजयी मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले. अनेक वर्षापासून मराठा आरक्षणाचं घोंगड़ भिजत पडलं होतं. सर्वोच्च न्यायालयात याप्रकरणी पुनर्विचार याचिका दाखल असताना राज्यपातळीवरही हे टिकणारं आरक्षण देण्याकरता सरकार प्रयत्न करत होतं. अखेर मनोज जरांगे पाटलांच्या लढ्याला मोठं यश मिळालं आहे, मध्यरात्री तब्बल तीन तास चर्चा झाल्यानंतर सरकारने मनोज जरांगेच्या सर्व मागण्यांचे सुधारित अध्यादेश जारी करून त्यांच्या मागण्या मान्य केल्या आहेत, यासंदर्भात मनोज जरांगे पाटलांनी मध्यरात्री पत्रकार परिषद घेऊन माहिती दिली. मराठा समाजाच्या मनोज जरांगे पाटील यांच्या माध्यमातून प्रलंबित मागण्या मान्य झाल्यामुळे मराठा समाजामध्ये उत्साह उत्साहाचे वातावरण बघायला मिळत आहे.

# महिला मतदार नोंदणीसाठी आज केशवराज माध्यमिक विद्यालयात विशेष शिबीर

लातूर, दि. ३० (जिमाका): लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या अनुषंगाने विशेष मतदार नोंदणी शिबीर आयोजित करण्याचे निर्देश भारत निवडणूक आयोगाने दिले आहेत. त्यानुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली २३५-लातूर शहर मतदारसंघामध्ये विविध उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. बुधवार, ३१ जानेवारी २०२४ रोजी लातूर शहरातील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात मकर संक्रांतीनिमित्त माता पालक मेळावा व हळदी कुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. याठिकाणी महिलांची संभाव्य उपस्थिती लक्षात घेता प्रशासनामार्फत याठिकाणी दुपारी ४ वाजता विशेष महिला मतदार नोंदणी शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. लोकशाही सक्षमीकरणाची पहिली पायरी मतदार नोंदणी आहे. निवडणुका पारदर्शक आणि न्याय्य वातावरणात पार पाडण्यासाठी मतदार याद्यांचे अद्ययावतीकरण, शुद्धीकरण अत्यंत महत्त्वपूर्ण असते. मतदार नोंदीमध्ये युवा वर्गांची मतदार नोंदणी होणे आवश्यक आहे. त्या दृष्टीकोनातुन लातूर शहर मतदारसंघामध्ये यापूर्वी अनेकवेळा मतदार नोंदणी शिबीरांचे आयोजन करण्यात आलेले आहे. मतदार नोंदणी शिबीरे हे अनेक कार्यक्रमाच्या अनुषंगाने व विविध कार्यक्रमाचे औचित्य साधुन आयोजित करण्यात येत असतात. या कार्यक्रमाद्वारे जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचून मतदार नोंदणी करण्यात येते. शहरातील श्याम नगर येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयामध्ये संस्थेच्यावतीने ३१ जानेवारी रोजी मकर संक्रांती निमित्त माता पालक मेळावा व हळदी-कुंकू कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमास महिलांची लक्षणीय उपस्थिती राहण्याची शक्यता लक्षात घेवून लातूरच्या उपविभागीय अधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे यांच्या संकल्पनेतून याठिकाणी दुपारी ४ वाजता महिलांसाठी विशेष मतदार नोंदणी शिबीर आयोजित करण्यात आले आहे. या शिबीराचा महाविद्यालयातील व महाविद्यालयाबाहेरील सर्व १८ ते १९ वर्षे वयोगटातील युवती, तसेच अद्याप मतदार यादीत नाव न नोंदविलेल्या महिलांनी लाभ घ्यावा. तसेच आपले नाव मतदार यादीत नोंदवावे, असे आवाहन उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे यांनी केले आहे.

# लातूर जिल्ह्यात ५ लाख कुटुंबांचे झाले सर्वेक्षण ! सर्वेक्षणाचे ९६ टक्के काम पूर्ण; १७ हजार ५५० कुटुंबांचे सर्वेक्षण शिल्लक

लातूर, दि. ३० (जिमाका): जिल्ह्यात महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगामार्फत जिल्ह्यात सुरु असलेल्या मराठा समाज व खुल्या प्रवर्गातील नागरिकांच्या सर्वेक्षणाचे २९ जानेवारी २०२४ पर्यंत ९६.६१ टक्के काम पूर्ण झाले आहे. या अंतर्गत ५ लाख ८८४ कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात आले असून उर्वरित सर्वेक्षणाची कार्यवाही ३१ जानेवारी २०२४ पर्यंत पूर्ण केली जाणार असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली आहे. जिल्ह्यात २३ जानेवारी २०२४ पासून सर्वे क्षणाला सुरुवात झाली आहे. ८ हजार ४८६ प्रगणक आणि ५१३ पर्यवेक्षक या सर्वेक्षणाच्या कामामध्ये प्रत्यक्ष कार्यरत आहेत. २९ जानेवारी पर्यंत लातूर शहरातील ७६ हजार ९०५, तर लातूर तालुक्यातील ग्रामीण भागात ७४ हजार १८२, अहमदपूर तालुक्यात ५५ हजार ११५, चाकूर तालुक्यात ३९ हजार २९५, उदगीर तालुक्यात ६० हजार २३३, जळकोट तालुक्यात १६ हजार ३१३, देवणी तालुक्यात १४ हजार ७२२, शिरूर अनंतपाळ तालुक्यात १९ हजार ८८०, निलंगा तालुक्यात ५० हजार ३८५, औसा तालुक्यात ६८ हजार ४४५ आणि रेणापूर तालुक्यातील २५ हजार ४०९ कुटुंबांचे असे एकूण ५ लाख ८८४ कुटुंबांचे सर्वेक्षण पूर्ण झाले आहे. तसेच सुमारे १७ हजार ५५० कुटुंबांचे सर्वेक्षण करण्याची कार्यवाही सुरु आहे. कुणबी नोंदी आढळलेल्या नागरिकांनी प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्याचे आवाहन जिल्ह्यातील अभिलेखांमध्ये आढळून आलेल्या कुणबी नोंदीनुसार दाखले वितरणाची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. या नोंदींची माहिती ग्रामपंचायत स्तरावर आणि जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच सर्व तहसीलदार कार्यालयांमध्ये याविषयी माहिती देण्यासाठी मदत कक्ष सुरु करण्यात आले आहेत. तरी कुणबी नोंदीधारक यांच्या वारसांनी कुणबी प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्यासाठी अर्ज करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले आहे.

# लातूर जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

लातूर, दि. ३० (जिमाका): जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी विजयकुमार ढगे यांनी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) (३) अन्वये लातूर जिल्ह्याच्या संपूर्ण हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केले आहेत. हा आदेश ३१ जानेवारी, २०२४ रोजीच्या ००.०१ वाजेपासून ते १४ फेब्रुवारी, २०२४ रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहील. या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत घेऊन फिरता येणार नाही. व्यक्तीचे प्रेते, आकृत्या व प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. जाहीरपणे घोषणा, गाणे म्हणणे, वाद्य वाजविणे यास प्रतिबंध राहील. तसेच कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास किंवा मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश धार्मिक सभा, अंत्ययात्रा, विवाह, अधिकारी, कर्मचारी यांना लागू राहणार नाही, असे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

# मोदी आवास योजनेच्या घरकुलांना १०० टक्के मंजुरी देणारा लातूर राज्यात दुसरा जिल्हा - मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर

लातूर, दि. ३० (जिमाका): मोदी आवास योजना ग्रामीण अंतर्गत इतर मागास प्रवर्गातील लाभार्थ्यांवसाठी लातूर जिल्ह्यात १०० टक्के मंजुरी देण्या त आल्याची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी दिली आहे. तसेच अशी मंजुरी देणारा लातूर हा राज्यात केवळ दुसरा जिल्हा असल्याचे त्यांनी सांगितले. सर्वांसाठी घरे-२०२४ या धोरणानुसार राज्यावतील बेघर, तसेच कच्च्या घरात वास्ताव्या्स असलेल्याा पात्र लाभार्थ्यांदना २०२४ मध्योे स्वतःचे हक्का चे घर मिळावे, यासाठी राज्य पुरस्कृात मोदी आवास घरकुल योजना राबविण्याात येत आहे. या योजनेतून पात्र लाभार्थ्यांना नवीन घर बांधण्यायसाठी, कच्च्या घराचे पक्याक घरात रुपांतर करण्यीसाठी रक्क४म १ लक्ष २० हजार रुपये अर्थसहा्य्य ऑनलाईन पीएफएमएस प्रणालीद्वारे थेट त्यांच्या बँक खात्यावर वितरीत केले जाते. मोदी आवास योजना ग्रामीण अंतर्गत जिल्ह्यात ६ हजार ३१८ घरांचे उद्दिष्ट प्राप्त झाले असून सर्व १०० टक्के लाभार्थ्यां ना मंजुरी देण्याात आली आहे. अहमदपूर तालुक्यात ६४०, औसा तालुक्यात ८३४, चाकूर तालुक्यात ७७६, देवणी तालुक्यात १९७, जळकोट तालुक्यात ५४०, लातूर तालुक्यात ७४९, निलंगा तालुक्यात ८५०, रेणापूर तालुक्यात ७०५, शिरूर अनंतपाळ तालुक्यात २६८ आणि उदगीर तालुक्यातील ७५९ घरकुलांना मंजूर देण्यात आली आहे. अनुदानाचा हप्ता प्राप्त होताच लाभार्थ्यांनी घरकुले तातडीने पूर्ण करावीत, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर आणि जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक कल्पना क्षीरसागर यांनी केले आहे.

# नवी मुंबई विकास आघाडीचा एकच ध्यास, संविधानामुळेच सर्वांगीण विकास.. (इव्हीएम) हटाव ! संविधान बचाव..!!





नवी मुंबई / के. एच. हनवते :- २९ जानेवारी २०२४ रोजी नवी मुंबई विकास अघाडीची महत्वपुर्ण बैठक विश्वकमल हॉटेल येथे शेतकरी कामगार पक्ष कार्यालय सीबीडी बेलापूर नवी मुंबई पार पडली. या बैठकीला प्रमुख पाहुणे म्हणून उल्काताई महाजन उपस्थित होत्या त्यात उपस्थित नेते पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी मिशन २०२४ लोकसभा, विधानसभा निवडणुका जवळ आल्या आहेत आणि त्या अनुषंगाने राज्यभर उभारणी करणा-या विविध पक्ष संघनांची मोर्चे बांधणी चालु आहे. आणि त्याचाच एक भाग म्हणून नवी मुंबई विकास अघाडींच्या बैठका अनेक ठिकाणीं चालू आहेत. नवी मुंबई व (एम एम आर डी ए) मधील सर्व संघटना अनेक कार्यक्रम आयोजित करीत आहेत. एकमेकांना सोबत घेऊन प्रभावी कार्यक्रम करूया. यासाठी फुले, शाहु आंबेडकर विचार धारी समविचारी राजकीय पक्ष, कामगार संघटना, सामाजिक संस्था व इतर कार्यकर्त्यांची बैठक विविध ठिकाणी आयोजीत करीत आहोत. या बैठकीसाठी रायगड, ठाणे, नवी मुंबई, मुंबई विभागातील काम करणारे सक्रीय कार्यकर्ते यांना सोबत घेऊन येणाऱ्या लोकसभा विधानसभा निवडणुकीत आपली सर्वांची एकच भुमीका (ई व्ही एम) हटाव संविधान बचाव..! हा नारा बुलंद केला तरच आपले संविधान सुरक्षित राहील यावर साधक बाधक चर्चा करण्यात आली. आणि इथून पुढील आपले फिल्डवर्क काम अधीक जोमाने करावे लागेल. मतदार जागृती अभियान, पोलिंग - बुथ बांधनी, वॉलेंटरी फोर्स यावर आपन जास्त भर दिला पाहीजे आसे सर्वानुमते ठरले. या बैठकीला आपल्या सर्वांचे वरिष्ठ दादा हिरामण पगार सर (घर हक्क संघर्ष समिती संस्थापक अध्यक्ष), तसेच खॉजामिया पटेल (म.प्र. उपाध्यक्ष रिपब्लिकनसेना), विरेंद्र लगाडे (नवी मुंबई जिल्हाध्यक्ष रिपब्लिकन सेना), चंद्रशेखर रानडे (जनता दल सेक्युलर), आर.एन. यादव (नवी मुंबई जिल्हाध्यक्ष समाजवादी पार्टी), कैलाश सरकटे (खजिनदार घर हक्क संघर्ष समिती), उमेश खंदारे (संघटक), सलीम मुल्ला, विनिता बाळेकुंद्री, विनिता बर्फे (महिला सेल अध्यक्ष मानव अधिकार), कर्नल चंद्रशेखर रानडे, कल्याणराव हनवते (पत्रकार), सुजाता गोटस्कर, सुबोत्रो भट्टाचार्य, सुजित निकाळजे, शुभम कोठारी, राजेंद्र कोरडे, उदय चौधरी, नरेश पाटील, सुनील कांबळे, श्री. साळवी, सुधाकर जाधव, कोंडीबा हिंगोले (युनियन कामगार), भिमराव तायडे, प्रकाश रणदिवे इत्यादी शेकडो कार्यकर्ते व महीला आधीक संख्येत उपस्थित राहून पुढील दिशा निर्देश ठरविण्यात आले.

# सुराज्य निर्माण सेना पक्षाच्या जिल्हाध्यक्षपदी भागवत भुजबळ यांची नियुक्ती



लातूर - दि. सुराज्य निर्माण सेना पक्षाच्या जिल्हाध्यक्षपदी भागवत भुजबळ यांची नियुक्ती करण्यात आली.बार्शी रोड येतील गणेश कॉम्प्लेक्स येथे बैठक संपन्न झाली.यावेळी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शिवानंद मठपती हे अध्यक्षस्थानी तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी सहशिक्षक वीरभद्र मठपती होते. यावेळी जिल्हाध्यक्ष म्हणून भागवत भुजबळ, उपाध्यक्ष बालाजी नागीने, शहराध्यक्ष बालाजी गिरी यांची नियुक्ती करून नियुक्तीपत्र देण्यात आले. मार्गदर्शन पर बोलताना प्रदेशाध्यक्ष शिवानंद मठपती म्हणाले सध्याच्या प्रस्थापित पक्षाला जनतेचे काहीच देणे घेणे नाही, खुर्चीसाठीच प्रयत्न अहोरात्र अशी अवस्था झाली आहे. बोलताना ते पुढे म्हणाले महागाईने कळस गाटला आहे, बेरोजगारीने उच्चांक गाटला आहे अशा परिस्थितीत जनसामान्याचे व तळागाळातील सामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी सुराज्य निर्माण सेना कटिबद्ध आहे. वीरभद्र मठपती म्हणाले सामान्य जनतेला एक पर्याय हवा आहे आणि तो पर्याय सुराज्य निर्माण सेना पक्ष आहे. जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल भागवत भुजबळ म्हणाले सुराज्य निर्माण सेना या पक्षात मी प्रवेश केला आहे आणि या पक्षाचे कार्य तन मन आणि धन लावून सामान्य जनतेला न्याय देण्यासाठी सज्ज आहे. यावेळी बिराजदार लक्ष्मण, दगडू अंडरगुळे, सिद्धेश्वर बिराजदार, संजय भुजबळ, गजानन लखादिवे, स्वप्निल हंडरगुळे, वामनराव ईनकर यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक पत्रकार लहू शिंदे यांनी केले तर शेवटी आभार संजय भुजबळ यांनी मानले यावेळी अनेक कार्यकर्ते व नागरिक उपस्थितीत होते.

# सर्व्हेअरला ५ हजारांची लाच घेताना रंगेहाथ पकडले

गंगाखेड: पंतप्रधान नागरी आवास योजने अंतर्गत मंजूर झालेल्या घरकुलाचे हप्ते टाकण्यासाठी ५ हजार रुपयांची मागणी करणा-या खाजगी संस्थेच्या सर्व्हेअरला दि. ३० जानेवारी रोजी दुपारी ३ वाजेच्या सुमारास एसीबीच्या पथकाने रंगेहाथ पकडून ताब्यात घेतले आहे. या कार्यवाहीने नगर परिषद कार्यालय परिसरात एकच खळबळ उडाली आहे.याबाबत समजलेली अधिक माहिती अशी की, गंगाखेड शहरातील एका लाभार्थ्यास पंतप्रधान नागरी आवास योजने अंतर्गत मंजूर झालेल्या घरकुल बांधकामासाठी नगर परिषद प्रशासनाकडून पहिला हप्ता देण्यात आला. या घरकुलाचे उर्वरित हप्ते टाकण्यासाठी खाजगी संस्थेमार्फत नगर परिषदेत पंतप्रधान नागरी आवास योजना घरकुल सर्व्हेअरचे काम करणा-या सरफराज सरदार पठाण रा. बनवाडी ता. सोनपेठ याने ५ हजार रुपये द्यावे लागतील असे म्हणून पैशांची मागणी केली.तेंव्हा घरकुल




लाभार्थी यांनी दि. २९ जानेवारी रोजी याबाबत परभणी येथील लाच लुचपत प्रतिबंधक कार्यालयात तक्रार दिल्याने दि. ३० जानेवारी रोजी परभणी लाच लुचपत विभागाचे पोलीस उपअधिक्षक अशोक इप्पर, पोलीस निरीक्षक बसवेश्वर जकीकोरे, पोलीस हवालदार चंद्रशेखर निलपत्रेवार, जनार्धन कदम, पोलीस शिपाई शेख जिब्राइल, अतुल कदम आदींनी दि. ३० जानेवारी रोजी दुपारी ३ वाजेच्या सुमारास डॉक्टर लाईन स्थित खाजगी कार्यालय परिसरात सापळा लावून तक्रारदार याच्याकडून ५ हजार रुपये लाचेची रक्कम स्वीकारतांना सरफराज पठाण यास ताब्यात घेत गंगाखेड नगर परिषद कार्यालयातील अभियंत्याच्या कक्षातील अलमारीस सिल ठोकल्याने एकच खळबळ उडाली आहे. याप्रकरणी सदर कर्मचा-याविरुद्ध गंगाखेड पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु होती.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE